# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१.

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक/मतदारयादी/वेबसाईटप्रसिद्धी/११५९/२०१४.
दिनांक :22/12/२०१४.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय : निवडणूक प्रयोजनार्थ वेबसाईटवर सहकारी संस्थांची मतदार यादी प्रसिद्ध करणेबाबत...**

संदर्भ : या प्राधिकरणाचे पत्र क्रं.रासनिप्रा/अ व ब वर्ग सह.सं/निवडणूक मा.सु./९४९/२०१४ दि.२/१२/२०१४.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी निवडणूक नियमातील नियम ४ मध्ये वर्गवारी करण्यात आलेली आहे. निवडणूक नियमातील तरतुदीनुसार मतदार यादया हया प्राधिकरणाच्या व सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थाळावर प्रसिद्ध करणेची तरतुद आहे. प्राधिकरणाची वेबसाईट तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, व ते अदयाप पुर्ण झालेले नाही.

उक्त संदर्भिय पत्रान्वये प्राधिकरणाने आपणास अ व ब वर्ग संस्थांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. तसेच सदर पत्रान्वये संस्थेच्या मतदार यादीच्या प्रती सहकार आयुक्त, साखर आयुक्त, वस्त्रोद्योग संचालक, आयूक्त दुग्ध विकास, आयुक्त मत्स्य विकास, आयुक्त पशुसंवर्धन शासनाच्या व संस्थेच्या वेबसाईटवरही प्रसिद्ध करणे बाबत सुचित केले आहे.

प्राथमिक तसेच अंतिम मतदार यादया स्वाक्षरीत करुन त्या नियोजित/प्रस्तावित केलेल्या दिनांकासच डीजीटल फॉर्म मध्ये संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राथमिक तसेच अंतिम मतदार यादया स्वाक्षरीत करुन त्या नियोजित/प्रस्तावित केलेल्या दिनांकासच डीजीटल फॉर्म मध्ये संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी, सदर स्वाक्षरीत मतदार याद्या सहकार आयुक्त, साखर आयुक्त, वस्त्रोद्योग संचालक, आयूक्त दुग्ध विकास, आयुक्त मत्स्य विकास, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास सादर कराव्यात. सादर केलेल्या मतदार याद्या या उपरोक्तप्रमाणे ज्या-त्या प्रस्तावित दिनांकासच डीजीटल फॉर्म मध्ये संकेतस्थळावर प्रसिद्ध होतील याची खात्री संबधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी स्वत: करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचा अहवाल या प्राधिकरणास सादर करावा.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेशानुसार.**

**(डॉ.आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहाकरी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. मा.आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. मा.साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. मा.संचालक,हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य,नागपूर.
४. मा.आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास,महाराष्ट्र राज्य,मुबंई.
५. मा.आयुक्त, मत्स्य विकास,महाराष्ट्र राज्य,मुबंई.
६. मा.आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,मुबंई.